Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA





Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | बदलत्या पर्यावरणाचे मराठी साहित्यातून झालेले चित्रण : कादंबरी<br>**प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर** | १-९ |
| २ | पर्यावरण चळवळींचे ऐतिहासिक मूल्य चिंतन<br>**श्री. अनिल महादेव बोराडे** | १०-१६ |
| ३ | महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धनात कृषी पर्यटनाचे योगदान<br>**प्रा. अनिल नि. शिंदे** | १७-२४ |
| ४ | संत साहित्यातील प्रतिबिंबीत पर्यावरण विचार : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. धनेश मधुकर हरड** | २५-३१ |
| ५ | जैवविविधता : संरक्षण व संवर्धन<br>**डोंगरजाळ भाग्यशाली रामसिंग** | ३२-३५ |
| ६ | शाश्वत विकास आणि भारतातील पर्यावरण चळवळी<br>**डोंगरजाळ सरिता रामसिंग** | ३६-३९ |
| ७ | अहमदनगर जिल्ह्यातील फळ विक्रेत्यांचे अर्थशास्त्र<br>**डॉ. सुहास आव्हाड**<br>**ईश्वर अरूण म्हस्के** | ४०-४३ |
| ८ | भारतातील पर्यावरणवादी चळवळ<br>**प्रा. काळुराम दामू शिंदे** | ४४-४७ |
| ९ | तुकडोजी महाराज यांचे शाश्वत कृषी विकास संकल्पनेतून पर्यावरण विकास संदर्भातील विचार आणि सूचविलेले उपाय<br>**शुभांगी विजयराज मोहोड** | ४८-५४ |
| १० | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे अध्ययन<br>**डॉ. अतुल हंसराज साळुंके** | ५५-५७ |
| ११ | बदलत्या पर्यावरणाचा आगरी मराठी कवितेवर झालेला परिणाम : एक आकलन<br>**डॉ. संदीपान श्रीमंत नवगिरे** | ५८-६३ |
| १२ | नाबार्ड बँकाचे ग्रामीण शेतकऱ्यांची विकासातील योगदान : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. बिराजदार एस. एम.** | ६४-६८ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | बदलत्या पर्यावरणाचे मराठी साहित्यातून झालेले चित्रण : कादंबरी<br>**प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर** | १-९ |
| २ | पर्यावरण चळवळींचे ऐतिहासिक मूल्य चिंतन<br>**श्री. अनिल महादेव बोराडे** | १०-१६ |
| ३ | महाराष्ट्रातील पर्यावरण संवर्धनात कृषी पर्यटनाचे योगदान<br>**प्रा. अनिल नि. शिंदे** | १७-२४ |
| ४ | संत साहित्यातील प्रतिबिंबीत पर्यावरण विचार : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. धनेश मधुकर हरड** | २५-३१ |
| ५ | जैवविविधता : संरक्षण व संवर्धन<br>**डोंगरजाळ भाग्यशाली रामसिंग** | ३२-३५ |
| ६ | शाश्वत विकास आणि भारतातील पर्यावरण चळवळी<br>**डोंगरजाळ सरिता रामसिंग** | ३६-३९ |
| ७ | अहमदनगर जिल्ह्यातील फळ विक्रेत्यांचे अर्थशास्त्र<br>**डॉ. सुहास आव्हाड**<br>**ईश्वर अरूण म्हस्के** | ४०-४३ |
| ८ | भारतातील पर्यावरणवादी चळवळ<br>**प्रा. काळुराम दामू शिंदे** | ४४-४७ |
| ९ | तुकडोजी महाराज यांचे शाश्वत कृषी विकास संकल्पनेतून पर्यावरण विकास संदर्भातील विचार आणि सूचविलेले उपाय<br>**शुभांगी विजयराज मोहोड** | ४८-५४ |
| १० | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे अध्ययन<br>**डॉ. अतुल हंसराज साळुंके** | ५५-५७ |
| ११ | बदलत्या पर्यावरणाचा आगरी मराठी कवितेवर झालेला परिणाम : एक आकलन<br>**डॉ. संदीपान श्रीमंत नवगिरे** | ५८-६३ |
| १२ | नाबार्ड बँकाचे ग्रामीण शेतकऱ्यांची विकासातील योगदान : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. बिराजदार एस. एम.** | ६४-६८ |

# १०. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे अध्ययन

**डॉ. अतुल हंसराज साळुंके**
डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय, रोहा, जि. रायगड.

## १) प्रस्तावना

भारत हा गरीब देश आहे. बहुसंख्य लोकांचे दारिद्रय ही भारतांच्या अर्थव्यवस्थेपुढील प्रमुख समस्या आहे. स्वातंत्र्य पुर्व काळात भारताची आर्थिक प्रगती खुंटण्याचे प्रमूख कारण म्हणजे ब्रिटीश सरकारची भारतातील सुमारे १५० वर्षाची राजवट हे होय. भारतातील शेती व्यवसायातील सरंजमशाही सदृश संबंधांची वाढ, अवजड व मुलभूत उद्योगांचा जवळजवळ संपूर्ण अभाव, भारतात तयार होणाऱ्या मालाला ब्रिटीश मालाशी यशस्वी स्पर्धा करण्यात आलेले अपयश, भारतात आर्थिक धोरणे आखताना व कार्यवाहीत आणताना ब्रिटनच्या हिताची केली गेलेली जपणूक यामुळे भारतीय शेती व्यवसायाला निर्वाह शेतीचे स्वरूप प्राप्त झाले. औद्योगिकदृष्टया भारत अप्रगत राहीला. औद्योगिक विकास न झाल्याने वाढत्या लोकसंख्येमुळे शेती क्षेत्रावर वाढता ताण पडत गेला. यामुळे भारतात गरिबी अधिक दिसून येते.

भारतातील बहुसंख्य लोकांचे दरडोई वास्तव उत्पन्न अल्प असल्यामुळे दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांसाठी असणारी मागणी खालच्या पातळीवर राहते. अल्प वास्तव उत्पन्नामुळे लोकांची खरेदीशक्ती कमी असते यामुळे उद्योजकांना व उत्पादकांना जास्तीत जास्त गुंतवणूकीसाठी प्रेरणा मिळत नाही. भांडवल गुंतवणूक कमी असल्यामुळे आर्थिक विकासाचा दर कमी राहतो. परिणामी, दारिद्र्यामध्ये आणखीनच भर पडत जाते.

## २) दारिद्रयाच्या व्याख्या

दारिद्रयाची व्याख्या स्थलपरत्वे, कालपरत्वे भिन्न –भिन्न असते. दारिद्रयाची संकल्पना देशानुसार बदलणारी आहे. जी व्याख्या भारतात केली ती जपानमध्ये लागू पडेलच असे नाही. भारतात दारिद्रयाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

१. ''ज्या व्यक्ती आपल्या मुलभूत गरजा भागविण्यापुरते सुद्धा उत्पन्न मिळवत नाही त्यांना दरिद्री संबोधले जाते.'' परंतू अमेरिकेसारख्या विकसित देशामध्ये दारिद्रयाची व्याख्या वेगळी आहे. तेथे मुलभूत गरजा भागविण्याइतके उत्पन्न सर्वांना मिळत असते परंतू ज्या व्यक्तीला किमान जीवनमान टिकवून ठेवता येईल एवढेसुद्धा उत्पन्न मिळत नाही अशा लोकांना दरिद्री म्हटले जाते . या अडचणींवर मात करण्यासाठी अलिकडे प्रत्येक व्यक्तीला मुलभूत अत्यावश्यक वस्तू विकत घेता येतात की नाही ते पाहीले जाते. लोकांच्या गरजा व सवयी बदलतात. त्यामुळे गरजांचे प्रामाणीकरण शक्य नाही दृ